Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

२६/२०२६

**विषय :-** जनगणना २०२७ स्वयं-गणना संदर्भात जगजागृती व सहकार्याबाबत..

**संदर्भ :-** विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर यांचे दि.१४/०५/२०२६ रोजीचे पत्र

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभाग तसेच सर्व संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्थेमधील संचालक, अधिविभाग प्रमुख, समन्वयक, प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांना उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून आदेशान्वये कळविण्यात येते की, जनगणना २०२७ चा पहिला टप्पा स्वयं-गणना कालावधी दि.०१ मे २०२६ ते दि.१५ मे, २०२६ व प्रत्यक्ष घरगणना (घराघरात जाऊन) दि. १६ मे २०२६ ते दि. १४ जून २०२६ निश्चित करण्यात आला आहे. स्वयं-गणनाच्या अनुषंगाने माहिती नोंदवण्यासाठी शासनाने पोर्टल (https://se.census.gov.in) उपलब्ध करुन दिलेले आहे. सदर पोर्टलचा वापर करुन त्यामध्ये सर्वांनी आपली माहिती अचूक नोंदवावी

तसेच, जनगणना हा देशाच्या भविष्यातील नियोजन आणि धोरणनिर्मितीसाठी आधारभूत ठरणारा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम असल्याने दि. १६ मे २०२६ ते दि. १४ जून २०२६ या कालावधीत जेंव्हा जनगणना कर्मचारी ( प्रगणक व पर्यवेक्षक ) आपल्या घरांना भेट देतील, तेंव्हा त्यांना आपण अचूक माहिती देऊन सहकार्य करावे.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

जावक क्रमांक आस्थापना / 671
दिनांक : 19 MAY 2026

**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी

२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय.

३) सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांचे प्राचार्य/ संचालक शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक.

४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**विभाग प्रमुखांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणावे.**

964

महाराष्ट्र शासन
विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर
राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४
E-mail: jdhekop@gmail.com

फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००

जा.क्र. : विसस/उशि/कोवि /जनगणना-2027/2026/E-2840545 दिनांक :- स्वाक्षरीप्रमाणे

प्रति,
1. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. कुलसचिव, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ,सातारा
3. कुलसचिव, वारणा समुह विद्यापीठ,वारणानगर ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर
4. प्राचार्य,सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये,कोल्हापूर विभाग.

विषय :- जनगणना २०२७ स्वयं-गणना संदर्भात जनजागृती व सहकार्याबाबत.

संदर्भ:- जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे पत्र क्र.कार्या. ७ अ/जनगणना/आरआर/१८६/२०२६,दि.१२.०५.२०२६.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, जनगणना २०२७ चा पहिला टप्पा स्वयं-गणना कालावधी दि.१ मे २०२६ ते १५ मे २०२६ व प्रत्यक्ष घरगणना (घराघरांत जाऊन) दि.१६ मे २०२६ ते दि.१४ जून २०२६ निश्चित करण्यात आला आहे. सदर जनगणनेच्या अनुषंगाने शासनाने यावेळी प्रथमच नागरिकांना त्यांची माहिती ऑनलाइन नोंदवण्याची सुविधा डिजिटल स्वयं-गणना पोर्टल (https://se.census.gov.in) द्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे माहितीची अचूकता वाढणार असून प्रत्यक्ष भेटीचा वेळही वाचणार असल्याचे नमूद केले आहे.

या राष्ट्रीय महत्त्वाच्या उपक्रमात आपल्या विद्यापीठाचे / महाविद्यालयाचे योगदान मोलाचे आहे. त्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, आपल्या विद्यापीठातील /महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी स्वयं-गणना पर्यायाचा जास्तीत जास्त वापर करावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.

आपल्या विद्यापीठातील /महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) किंवा इतर विभागांमार्फत समाजातील नागरिकांमध्ये या डिजिटल पोर्टलबाबत जनजागृती करुन दिनांक १६.०५.२०२६ ते १४.०६.२०२६ या काळात जेव्हा जनगणना कर्मचारी (प्रगणक व पर्यवेक्षक) घरांना भेट देतील, तेव्हा जनगणना हा देशाच्या भविष्यातील नियोजन आणि धोरणनिर्मितीसाठी आधारभूत ठरणारा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम असल्याने, त्यांना अचूक माहिती देऊन सहकार्य करण्याबाबत आपल्या स्तरावरुन सर्वोच्च प्राधान्याने सर्वांना सूचित करावे.

Digitally signed by
Vilas Dhondu Kadam
Date: 14-05-2026
18:49:09

[प्रशासन अधिकारी ]
विभागीय सहसंचालक (उच्च् शिक्षण)
कोल्हापूर

**सोबत :- संदर्भाधिन पत्राची प्रत**

प्रत :- मा. जिल्हा जनगणना अधिकारी, तथा निवासी उपजिल्हाधिकारी, कार्या 7.अ, करमणूक कर विभाग,कोल्हापूर यांना माहितीस्तव